# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९२-२२ दिनांक २४/१२/२०२२

## मुकबधीर इसमाची निर्घृणणपणे हत्या करणा-या अज्ञात आरोपीस ७२ तासात अटक करुन खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व युनिट २ वसई गुन्हे शाखेला यश.

दिनांक २०/१२/२२ रोजी सायंकाळी ५.०० वा पुर्वी वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दिमध्ये नायगाव पुर्व ऑरनेट लिंक रोड ते स्टार सिटीकडे जाणा-या कच्चा रोडच्या डाव्याबाजुचे मोकळया जागेत इसम नामे सुनिल तिवारी वय ३४ वर्ष, राह. जौनपुर राज्य-उत्तरप्रदेश यास कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन मारहाण करुन पांढ-या रंगाच्या उपरण्याने गळा आवळुन जीवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने त्यास निर्जन स्थळी टाकले होते. सदरबाबत वालिव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं १३३८/२२ भा.द.वि क ३०२, २०१ प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयात मयताची ओळख पटली होती परंतु तो मुकबधीर होता तसेच तो नुकताच गावाहून आला होता त्यामुळे त्यास कोणी मारले व का मारले याबाबत काहीएक उलगडा होत नव्हता. तसेच त्याला नालासोपारा या ठिकाणी जाणे आवश्यक असताना तो नायगाव स्टेशन येथे का उतरला या प्रश्नाचे उत्तर देखील मिळत नव्हते. त्यामुळे अशा संवेदनशील गुन्हयाचा कसोशीने तपास करण्याचे आदेश श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त गुन्हे यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व युनिट २ वसई यांना दिले होते. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखेने समांतर तपास सुरु करुन गुन्हयाचे घटनास्थळी पथकातील अधिकारी/अंमलदार यांनी भेट देवून घटनास्थळाची व परिसराची बारकाईने तपासणी करुन सतत तीन दिवस अहोरात्र मेहनत घेवुन तांत्रीक पुरावे हस्तगत करुन विश्लेषण केले तसेच साक्षीदार यांचेकडे सखोल तपास करुन आरोपी नामे यशवर्धन अशोक झा, वय २१ वर्षे, राठि. रुम नं. डी/१०४, ऑर्नेट गॅलक्सी, ज्युचंद्र, नायगांव (पुर्व), ता. जि. ठाणे यास त्याचे राहते घरातुन दिनांक २३/१२/२०२२ रोजी ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्हाच्या अनुषंगाने प्राथमिक तपास करता त्यानेच मयत इसमास लुटण्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. मयत इसम हा नुकताच त्याचे मुळ गाव जौनपूर उत्तर प्रदेश येथून रेल्वेने आला होता. तो मुकबधीर असल्यामुळे त्याचेकडे मोबाईल नव्हता त्यावेळी त्याने आरोपीस त्याचे कडील चिठ्ठीवरील मोबाईल नंबरवर संपर्क करुन मयताचे नालासोपारा येथिल भावास स्टेशनवर बोलाविण्याबाबत विनंती केली. त्यावेळी आरोपीस मयत इसमाची असहाय्यता लक्षात आल्याने त्याने मयतास लुटण्याचा प्लान तयार केला. त्यानुसार आरोपी याने चिठ्ठीवरील भावाचा फोन बंद असल्याचा बहाणा करुन मयत इसम यास फोन संपर्क होताच भावाला बोलावून घेईल असे सांगितले व तो पर्यंत मी जवळच रहावयास असून बॅचलर राहतो असे सांगून भावाचा फोन चालू होईपर्यंत आपण माझे घरी येवून आराम करावा असा बहाणा करुन मयत इसम यास नायगाव पुर्व येथिल एका निर्जनस्थळी घेवून गेला. सदर ठिकाणी नेल्यानंतर मयत इसम याचा मुकबधीर असल्याचा व असहाय्यतेचा गैरफायदा घेवून त्याचे पैसे व साहीत्य

लुटण्याचा प्रयत्न केला परंतु मयत इसमाने त्यास विरोध केला त्यामुळे आरोपी यशवर्धन झा याने त्यास दगडाने चेहऱ्यावर गंभिर दुखापत करुन मयताचे खांदयावरील उपरण्यानेच त्याचा गळा आवळून निघृणपणे खुन करुन मृतदेह जागीच गवतात टाकून पळुन गेला होता. सदर आरोपीस पुढिल तपासकामी वालीव पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करण्याकरीता मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व युनिट २ वसई येथील खालील अधिकारी व अंमलदार यांनी सतत तीन दिवस अहोरात्र मेहनत घेवून संशईताबाबत कोणताही पुरावा नसताना खुनाचा गंभिर गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. राहुल राख, श्री. शाहुराज रणवरे (कक्ष-२), सपोनि दत्तात्रय सरक, सागर शिंदे, अमोल अंबावणे, श्रेणी पोलीस उप निरीक्षक चंद्रकांत पोशिरकर, सपोउनि. रमेश भोसले, संजय नवले, संतोष चव्हाण, पोहवा मनोहर तावरे, प्रविणराज पवार, राजविर संधु, सतिष जगताप, अनिल नांगरे, आसिफ मुल्ला, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, सुनिल कुडवे, जयकुमार राठोड, पोहवा.सचिन पाटील, दादासाहेब आडके, रमेश आलदर, प्रशांत ठाकुर पोअंमलदार हनुमंत सुर्यवंशी यांनी यशस्वीरित्यारी केलेली आहे.



-------------- 0000 --------------